| MHKO140000702026 | **फौजदारी किरकोळ अर्ज ६/२०२६ मधील नि.१ खालील आदेश**<br>मलिक्कार्जुन तिरकाप्पा सुनगार तर्फे व सुहील जमील जमादार<br>**वि.**<br>महाराष्ट्र सरकार |
|---|---|

अर्जदार मलिक्कार्जुन तिरकाप्पा सुनगार यांनी सदरचा अर्ज पोलीस स्टेशन चंदगड यांच्याकडे जप्त असलेला मुद्देमाल ''**Ashok leyland Ltd. कंपनीचे मॉडेल DOST RLS**'' त्यांना परत मिळणेसाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७ व ५०३ अन्वये केला आहे.

**अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की:**

(२) अर्जदार यांचे **Ashok leyland Ltd. कंपनीचे मॉडेल DOST RLS** हे वाहन अपराध क्र.२९१/२०२५ मध्ये पोलीस स्टेशन चंदगड यांनी जप्त केलेले आहे. सदरचा गुन्हा हा भा. न्या. स. २०२३ चे कलम ३२५, ३(५) व महाराष्ट्र पशु सरंक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ सी, ९ ए प्रमाणे चंदगड पोलीसांनी दाखल केला आहे. सदर जप्त वाहन हे अर्जदाराचे कौटूंबिक, वैयक्तिक तसेच व्यवसायाच्या गरजेकरीता वापर करत होते. यातील गुन्ह्याशी अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. जप्त वाहन हे पोलीस ठाणेत पडून राहिलेस त्याची बॅटरी, इंजिन व इतर आवश्यक भाग खराब होणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन हे वापरण्यायोग्य राहणार नाही. सदर गुन्हयाचा तपास होवून आरोपीविरूद्ध दोषारोपपत्र दाखल होवून सदर केस गुणदोषावर चालणेस बराचसा कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत सदरचे वाहन हे पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास अर्जदार यांचे फार मोठे नुकसान होईल. न्यायालयाने सदर वाहन हे योग्य त्या अटीवर अर्जदाराच्या ताब्यात द्यावा. अर्जदार हा

न्यायालयाने लादलेल्या अटींचे पालन करण्यास तयार आहे.  तरी सदर अर्ज मंजूर करावा अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

(३) सदर अर्जावर अर्जदाराचे वकील व सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभियोग पक्षाने सदर अर्जास नि.क्र.५ वर विरोध दर्शविला आहे आणि नि.क्र.६ वर तपासी अधिकारी यांनी कथन केले आहे की, सदर जप्त वाहन हे म्हणण्यात विविध कारणे नमुद करुन सदर जप्त मुद्देमाल परत देण्यास हरकत दर्शविली आहे. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या समर्थनात कागदपत्रे यादी नि.०३ प्रमाणे अर्जदार याने गु.र.नं.२९१/२०२५ ची एफआयआर प्रत, जप्त वाहनाचे आर.सी. बुक, आधारकार्ड, पॉवर आफॅ ॲटरनी, वाहनाचा इन्शुरन्स या सर्वांची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदर अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, '**Ashok leyland Ltd. कंपनीचे मॉडेल DOST RLS**' ची मालकी अर्जदार यांचे नावे आहे. वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, सदर जप्त वाहन हे अर्जदाराचे आहे. त्यामुळे सदर वाहन हे अर्जदारास पुढील अटींवर व सुपूर्दनामा बंधपत्रावर देणे योग्य होईल. तरी मी पुढील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार यास अपराध क्रं. २९१/२०२५, भा. न्या. स. २०२३ चे कलम ३२५, ३(५) व महाराष्ट्र पशु सरंक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ सी, ९ ए प्रमाणे पोलीस स्टेशन चंदगड यांनी जप्त केलेले वाहन '**Ashok**

**leyland Ltd**. **कंपनीचे मॉडेल DOST RLS**' कलर IRISH CREAM, इंजिन क्र. GNH039476P, चेसिस क्र. MB1AA22EXNRGZ1087 आणि त्याचा रजिस्ट्रेशन क्र. KA 26 B 4377 हे ५०० रू. चे बॉडवर क्षतीपूर्ती बंधपत्र रक्कम रु.६,००,०००/–(सहा लाख रूपये फक्त) स्विकारुन अंतरीम स्वरुपात खालील अटीवर परत देणेत यावे.

अ) जप्त वाहन हे अर्जदाराने विकू नये अगर इतर कोणत्याही मार्गाने त्याचे हस्तांतर करु नये.

ब) सदर वाहनाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये.

क) सदर वाहन न्यायालय ज्या ज्या वेळी आदेश करतील त्या त्या वेळी अर्जदाराने न्यायालयात हजर करणेचा आहे.

३) जर अर्जदाराने कोणत्याही एका अटीचा भंग केला तर त्याने लिहून दिलेले क्षतीपूर्ती बंधपत्र जप्त करुन बंधपत्राची रक्कम त्याचेकडून वसूल करुन सरकार जमा केली जाईल.

४) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चंदगड यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदारास कागदपत्रांची पडताळणी करुन उपरोक्त वाहन ताब्यात द्यावे.

सही/–

**चंदगड** **(व्ही.एस.अग्रवाल)**

**दिनांक–१६/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चंदगड**